**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी - ४११ ०१८**

**सावित्रीबाई फुले अकादमी,क्रीडा विभाग**

**जाहीर प्रकटन क्र- १ /२०२४-२५**

या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रीडा विभागाअंतर्गत सावित्रीबाई फुले अकादमी (S.P.A) आय ट्रेंड लाईफ - ३, काळा खडक, वाकड येथे सुरु करण्यात आलेली आहे. सावित्रीबाई फुले अकादमी येथे विद्यार्थ्यांकरिता काही जागा रिक्त असून SIACमार्फत आयोजित करणेत आलेली प्रवेश परिक्षा दिलेले परंतु अंतीम निवड न झालेले तसेच प्रवेश परीक्षा न दिलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवासी पुरावा असणारे पदवीधर व UPSC परीक्षेचा अभ्यास करणा-या इच्छुक विद्यार्थ्यांमार्फत अर्ज मागविण्यात येत आहे.

अर्ज करणारे इच्छुक विद्यार्थी पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे तसेच इयत्ता दहावीमध्ये प्रथम श्रेणी उत्तीर्ण असावा. विद्यार्थ्याने को-या कागदावर संचालक, सावित्रीबाई फुले अकादमी यांच्या नावे अर्ज करावा. अर्जासोबत दहावीची गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत दाखल करावी. तसेच रहिवास पुराव्याकरीता (आधारकार्ड, मतदान कार्ड, पासपोर्ट, पालकांच्या नावे असलेले विद्युत देयक, रेशनकार्ड, वाहनपरवाना, पालकांच्या नावे असलेली कर पावती) यापैकी एक पुरावा जोडणे आवश्यक आहे.विद्यार्थ्याचा दहावी(एस.एस.सी) मधील गुणाचा प्राधान्याने विचार केला जाईल.

वृत्तपत्रामध्ये व मनपाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध झाले पासून ४ दिवसांत अर्ज ई-मेल द्वारे sports@pcmcindia.gov.in या ई-मेलवर अथवा क्रीडा विभाग,पिं.चिं.मनपा कार्यालय खराळवाडी येथे साप्ताहीक सुट्टी वगळता १०.०० ते ५.०० या वेळेत सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. जाहीर प्रकटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर पाहणेसाठी उपलब्ध आहे.

सही/-
(पंकज पाटील)
उप आयुक्त,क्रीडा
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

जाहिरात क्रमांक - १/२०२४-२५
सावित्रीबाई फुले अकादमी,क्रीडा विभाग
क्र.क्रीडा/साफुअ/२/कावि/ 75 /२०२४
दि. 20 /१२ /२०२४